
Students' Bulletin, University of Pune

# Chetana
# चेतना



**Editor in Chief :** Dr. Narendra Jadhav, Vice Chancellor
**Publisher :** Dr. Manik Jadhav, Registrar
**Editor :** Dr. Sambhaji Pathare, Director, Board of Students Welfare


Issue : 1 June 2008

## Inside

Page No.


1 Past Events
2 Current Affairs
3 University Campus
4 Curricular
5 Co-Curricular
6 Extra-Curricular
7 Announcements & Highlights
8 College Activities
9 Upcomings
9 Visitors












### विद्यार्थी कल्याण मंडळाच्या विविध योजना

- विद्यार्थी सुरक्षा विमा योजना
- आपत्कालिन सहाय्य योजना
- विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजना
- डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा
- अभिरुप न्यायालय स्पर्धा
- समर्थ भारत अभियान
- प्लेसमेंट सेंटर
- महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा
- एन. सी. सी. छात्रांचा सत्कार समारंभ
- शैक्षणिक उपक्रम, कार्यशाळा, चर्चासत्र, उजळणी वर्ग
- 'कमवा व शिका' शैक्षणिक हमी योजना
- विशेष मार्गदर्शन योजना
- निर्भय कन्या अभियान
- युवक महोत्सव
- आपत्कालिन व्यवस्थापन प्रशिक्षण
- विद्यार्थी वार्ता प्रकाशन
- विद्यापीठ प्रतिनिधी शिबीर
- विद्यापीठ प्रतिनिधी निवडणुक व विद्यार्थी परिषद
- साहस शिबिरे
- पदव्यूत्तर जिमखाना



## कुलगुरुंचा संदेश

विद्यार्थी मित्रहो ......

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने केवळ विद्यार्थ्यांसाठी काढलेला 'चेतना' हा अंक आपल्या हाती देताना मला विशेष आनंद वाटतो.

पुणे विद्यापीठ उत्कृष्टता आणि भविष्याचा अचूक वेध घेण्याची क्षमता असणारे अग्रगण्य विद्यापीठ आहे. तसेच ते ज्ञानार्जनाचे एक सर्वोत्तम केंद्रही आहे. विद्यापीठ केवळ पदवी वितरणाचे केंद्र बनू नये तर, एकूणच सामाजिक गतिमानतेला हातभार लावणारे प्रभावी माध्यम असावे, यासाठी सामाजिक अपेक्षा आणि समस्यांचे भान राखून विद्यापीठाचे कामकाज व्हावे, यासाठी विद्यापीठाची सर्व अधिकार मंडळे दक्ष असतात. उच्च शिक्षणाच्या केंद्रस्थानी असलेल्या युवापिढीचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांचा आत्मविश्वास वृध्दींगत व्हावा आणि प्रत्येक पदवीधर आणि उच्च पदवीधर तरुण एक सक्षम, नितीमान, संयमीआणि स्वयंशिस्त नागरिक होऊन बाहेर पडावा, यासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ अविरत प्रयत्नशिल आहे.

सर्व विद्यापीठीय उच्च शिक्षणाचे केंद्रस्थान म्हणजे विद्यार्थी ! आणि म्हणूनच विद्यार्थ्यांच्या अनेक विकास योजनांसाठी विद्यापीठाच्या वार्षिक अर्थसंकल्पात खास तरतूदी केल्या जातात. ज्यामध्ये गरीब, गरजू, होतकरु आणि ग्रामीण विद्यार्थ्यांकडे प्राधान्याने लक्ष दिले जाते. या विद्यापीठाच्या कक्षेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता ५ लाख ५० हजारावर गेली आहे. सन २००६ पासून विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या हिताचे अनेक उपक्रम कार्यान्वित केले. निर्भय कन्या अभिमान, समर्थ भारत अभियान, विद्यार्थी विमा योजना, वक्तृत्व स्पर्धा, अभिरुप न्यायालय (मूट कोर्ट) स्पर्धा, युवक महोत्सव, कमवा व शिका यांसारख्या अनेक योजनांना विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला आहे. यावर्षापासून प्लेसमेंट सेंटर, आपत्कालिन व्यवस्थापन प्रशिक्षण यांसारखे नवे उपक्रम राबविण्याचा विद्यापीठाचा मनोदय आहे. या विविध योजनांबरोबरच विद्यापीठाच्या महत्त्वपूर्ण घडामोडींची माहिती आपल्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य या अंकातून होऊ शकेल.

विविध अधिकार मंडळांकडून केवळ विद्यार्थ्यांसाठी घेतले गेलेले निर्णय, विविध महाविद्यालयांनी राबविलेले स्तुत्य उपक्रम, नव्याने सुरु होणारे शैक्षणिक उपक्रम आणि योजनांची अद्ययावत माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावी यासाठी 'चेतना' हा अंक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**डॉ. नरेंद्र जाधव**
कुलगुरु



## संपादकीय

अतिशय झपाट्याने बदलणाऱ्या सामाजिक वास्तवातून आपण सारेच मार्गक्रमण करत आहोत. इथे इच्छा अथवा अनिच्छेचा मुद्दाच नाही इतका जबरदस्त त्याचा वेग आहे. वरवर पाहता चकचकित दिसणाऱ्या व स्वप्नवत भासणाऱ्या या ग्लोबल व्हिलजचं अंतरंग अतिशय भयाण आहे. या परिस्थितीचा सामना करताना विद्यार्थी भरकटू नये, त्याला या दशेतही योग्य दिशा मिळावी यासाठी 'चेतना' हा अंक सर्वांचा दिपस्तंभ ठरावा या करिता केलेला हा प्रयत्न होय.

१८५७ ला 'मुंबई', 'कलकत्ता' आणि 'मद्रास' विद्यापीठांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने भारतात उच्च शिक्षणाला प्रारंभ झाला. एकविसाव्या शतकात ही संख्या २५० च्या वर गेली असली तरी 'पुणे विद्यापीठ' राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले वेगळेपण टिकवून आहे. म्हणूनच सुमारे ९० वेगवेगळ्या देशांचे विद्यार्थी या विद्यापीठात येऊन उच्चशिक्षण संपादन करतात.

विद्यार्थी हा उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगिण विकासासाठी शैक्षणीक अभ्यासक्रमांबरोबरच शिक्षणेतर उपक्रमांची ही इथे रेलचेल आहे. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी विद्यापीठाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची माहिती लाभार्थी पर्यंत पोहचविण्यासाठी मा. कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी 'विद्यार्थी वार्ता' हे माध्यम अतिशय उपयुक्त ठरेल अशी भावना व्यक्त केली. त्यानुसार या अंकाची निर्मिती विद्यार्थी कल्याण मंडळाने केली. अंकाची रचना अतिशय सुटसुटीत व वाचकांच्या दृष्टीने उपयुक्त ठरावी अशी आहे.

'चेतना' च्या अंतरंगात अनुक्रमणिकेत नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळी सदरे असतील. विविध महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे वर्गीकरण या सदरांमध्ये करण्यात येईल पहिल्या अंकासाठी प्राप्त झालेली माहिती एवढी प्रचंड आहे की त्यामुळे सर्वच माहिती या अंकात प्रकाशित करणे शक्य नव्हते. तथापी आपण आपल्या महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त संस्थेची आणि पदव्यूत्तर विभागाची निवडक माहिती आवश्यक त्या छायाचित्रासह त्वरीत या विभागाकडे पाठविल्यास 'चेतना' च्या पुढील अंकात प्रकाशित करणे सुलभ होईल. अंकाबाबत वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया जरुर कळवाव्यात, निवडक प्रतिक्रिया पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील.

अंकाच्या निर्मितीसाठी कुलगुरुंनी नियुक्त केलेल्या समितीच्या सर्व सदस्यांचे उत्कृष्ठ मार्गदर्शन लाभले. महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थांनी 'चेतना' हा अंक सर्व विद्यार्थ्यांसाठी योग्यप्रकारे प्रदर्शित करावा.

**डॉ. संभाजी पठारे**
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

# Past Events


## Convocation:

On the occasion of 101st Convocation held on 20th Dec. 2007, University of Pune Awarded as many as 236 Ph.D.s, 49 Gold Medals and 53,916 other degrees. Hon'ble Lord Meghnad Desai, Internationally renowned Economist and member, House of Lords, British Parliament was the Chief Guest for this Convocation, 19745 students from Pune, Ahmednagar, and Nashik Districts visited University Campus on this day.



## Operation Makeover:

The University is symbolically identified with the Main Building, which is a heritage structure. The great structure has been crumbling. As a corrective measure, a massive structural restoration and reconstruction exercise is currently underway. Further, University of Pune has also undertaken a project of Operation makeover Plan so as to completely reorganize the campus to make optimal use of its space, In this regard, University of Pune conducted a competition amongst the Architecture colleges to prepare a Master Plan for the Campus Makeover.



## विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन : १० फेब्रुवारी, २००८

मा. कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहण करुन सुरक्षा विभागातील सेवकांची मानवंदना स्वीकारली. यानिमित्त उपस्थित असलेल्या विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात कुलगुरुंनी अध्यापन, संशोधन व शिक्षकेतर उपक्रमांमध्ये विद्यापीठाने केलेल्या कामाचा विस्तृत आढावा घेऊन सर्वांना वर्धापन दिनाच्या शुभेच्या दिल्या. सकाळी १० वाजता संपन्न झालेल्या मुख्य समारंभात 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' तसेच अन्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. श्री. निळू फुले, डॉ. सरोजिनी बाबर, श्री. बेजन देसाई, श्री. बाबूराव बागुल, श्री. अण्णा हजारे व श्री. रामनाथ वाघ यांना 'जीवन साधना' गौरव पुरस्काराने सन्मानित केले. श्री. शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, रावबहादुर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर आणि मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर यांची उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून निवड करण्यात आली. वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री. मोहन धारिया उपस्थित होते.



## Public Lectures:

Hon'ble Vice - Chancellor Dr. Narendra Jadhav initiated a Lecture series in honour of the first Six Vice – Chancellors of University of Pune viz. Barrister Dr. M.R. Jaykar, Wrangler Sir R.P. Paranjape, Prin. D.G. Karve, Mahamahopadhyay Dr. Datto Waman Potdar, Dr. Kakasaheb Gadgil and Dr. Dhananjay Gadgil. Justice P.B. Sawant delivered First lecture of this series in honour of Barrister M.R. Jaykar on the topic ' Law & Social Justice'.

Important Public lectures by renowned international personalities were held in the University. These distinguishing personalities include His Excellency David Malone, the Canadian High Commissioner to India, Jon Hustsman ; Governer, state of Urah, USA, Dr. Janos Maga, Hungary, Prof.Gayatri Chakravorty Spivak, Columbia University, New York(USA)

## Delegations:

Delegations from various Universities in India and abroad like US, Austria, Canada, USA, China, Japan, Germany, and France visited our University and appreciated the ongoing work and held fruitful discussions and in several cases signed MoUs for mutual collaborations in various fields.

## हैद्राबाद बॉम्बस्फोट दुर्घटनेतील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत :

दिनांक २५ ऑगस्ट, २००७ रोजी, सायंकाळी ७ ते ८ च्या दरम्यान हैद्राबाद मधील 'लुम्बीनी पार्क' येथे लेझर शो पहात असताना सायंकाळी ७.४५ च्या सुमारास त्याठिकाणी बॉम्बस्फोट झाला. त्यामध्ये ७ विद्यार्थी मृत्यूमुखी पडले आणि ८ विद्यार्थी भयंकर जखमी झाले. यासंदर्भात खास बाब म्हणून प्रत्येक जखमी विद्यार्थ्यास तातडीची आर्थिक मदत रु. ५०,००० प्रमाणे रु. ४,००,००० देण्याचा निर्णय मा. कुलगुरुंनी घेतला.

### Earn and Learn Scheme

The scheme is for the benefit of Poor and needy students from Colleges / Institutes and PG depts. on campus. It helps inculcating the work culture amongst the students. The honorarium for the work done is paid at the rate of Rs.18 per hour For further details please contact Students' Welfare Officer of your College / Institute or visit Students' Welfare Website. http://www.unipune.erent.in/dept/bsw

### Student's Safety Insurance

The scheme is run by University in collaboration with an insurance company. Each student has to pay Rs.2 at the time of admission to get benefit of the scheme. The insurance company pays against the accident claim upto Rs.30,000 for injury and Rs.50,000 for accidental death. For details 25449764(Pune), 2343372(Nagar), 2572788(Nashik)

# Current Affairs

## Syllabi Revised

Syllabus of first year of Under Graduate and first year of Post Graduate of all faculties has been revised from the academic year 2008-09.

for details visit

http:// www.unipune.erent.in under academic circulars.

## १२वी नंतर काय ?

पुणे विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतर्गत १२वी नंतर च्या उपलब्ध पदवी, पदविका इत्यादी अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थी आणि पालकांना देण्यासाठी विद्यापीठाने प्रथमच 'करिअर महोत्सव व एज्युकेशन केअर' चे आयोजन ११ ते १३ जून २००८ या कालावधीत केले आहे. यावेळी करिअर कौन्सेलिंग व परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रातील करिअरच्या संधीबद्दल अरुण बोंगिरवार, अविनाश धर्माधिकारी, नितीन करीर, संजय चहांदे, विश्वास नांगरेपाटील, के. एन. गणेशन आणि डॉ. नरेंद्र जाधव हे मार्गदर्शन करतील.

## Candidate can obtain photo copy of Answer book/s : (Please refer UoP Circular No. 123 of 2008 for further details.)

The students (examinee/s) can obtain photocopy /ies/ Xerox copies of assessed theory subject/s answer book/s of the current examination only. The photo copy/ies of answer book/s of practical examination, sessional marks, marks of viva-voce / dissertation / thesis /project, CET conducted by University shall not be supplied. Candidate can apply within 10 days from the date of declaration of result.

- Application forms are available at Publication Unit and Regional centers of University of Pune
- Candidate shall submit application to the Principal of college along with fees. Photo copy/ies shall be made available within 45 days through the Principal of the college.

## Candidate can apply for Convocation throughout the year:

(Please refer UoP Circular No. 178 of 2008 for further details.)


The candidate who has passed the examination before the date of convocation held in the year and qualified for the award of the degree / diploma concerned can apply for degree / diploma certificates throughout the year. The certificates will be issued throughout the year except the period of 30 days before regular convocation of the year.

## गौतमनगर महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे कुलगुरु मा. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते उद्घाटन :

दि. १४ जानेवारी, २००८ रोजी, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गौतमनगर महाविद्यालयांच्या नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सॉफ्ट स्किलचे आठ मंत्र आत्मसात करुन जीवनात प्रगती साधावी. ग्रामीण भागातील विद्यार्थी कोणत्याही बाबतीत कमी नाही, त्यांच्यात फक्त आत्मविश्वासाचा अभाव आहे, असे डॉ. नरेंद्र जाधव यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून मार्गदर्शन केले. यावेळी मा. शंकरराव काळे उपस्थित होते.



## सुवर्णपदक विजेते विद्यार्थी



या शैक्षणिक वर्षामध्ये **श्रीमती कोठावदे कविता अरविंद**, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळवण, जि. नाशिक यांना **'दी प्रेसिडेंट ऑफ इंडिया डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्णपदक'** प्रदान करण्यात आले.

- **कला, ललितकला व प्रयोगजीवीकला विद्याशाखा** : श्री. माने महेंद्र भगवान, श्रीमती लाहाडे अश्विनी सुहास, श्री. पोंक्षे संकेत दिलीप, श्रीमती जोशी श्वेता दिलीप व श्री. सराफ शार्दूल सूर्यकांत.
- **मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखा** : श्रीमती परांजपे निलिमा रमेश, श्रीमती चौहान अर्चना सुदर्शनकुमार, श्रीमती साळवे सुंदर दिगंबर, श्रीमती राजवळ प्रमोदिनी विजय व श्रीमती आलेकरी अश्विनी शिवाजी.
- **विज्ञान विद्याशाखा** : डॉ. समीर चव्हाण, श्रीमती वैष्णव रिचा, श्री. प्रशांत मणी करकी, श्री. कालेल विशाल चंद्रकांत, श्रीमती खान हूर मोहम्मद शब्बीर खान, श्रीमती एन. संध्याराणी देवी, श्रीमती सातपुते शीतल दत्तात्रय व श्रीमती शुभदा वसंत भोसले.
- **विधी विद्याशाखा** : श्री. कुमार प्रिया रंजन, श्री. कुमार प्रिया रंजन, श्री. भावे चेतन उमेश, श्री. मोहिते वधवा व श्री. घडियाली वेरा जहांगिर.
- **अभियांत्रिकी विद्याशाखा** : श्रीमती कंद सोनाली सुरेश, श्रीमती लेले रुचा प्रमोद, श्री. इनामदार मंदार रामचंद्र, श्री. करंदीकर कानद मंगेश, श्री. जालिया आफताब अमिराली, श्री. नहार निखिल सतेजलाल व श्री. नहार निखिल सतेजलाल.
- **वाणिज्य विद्याशाखा** : श्रीमती ब्रीटो अनिका मारिओ.
- **व्यवस्थापन विद्याशाखा** : श्री. अथनीकर अभिजित प्रमोद व श्री. शिरोडकर पुरुषोत्तम प्रकाश.
- **औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा** : श्रीमती रतलाम नाजनीन झुल्फिकार.
- **शिक्षणशास्त्र विद्याशाखा** : श्री.आरडे दत्तात्रय दशरथ व श्रीमती वारे सुवर्णा सर्जेराव.
- **शारीरिक शिक्षण विद्याशाखा** : श्रीमती गुर्जर मिथिला रणजित.
- **आयुर्वेद विद्याशाखा** : श्रीमती तायडे रेखा शाळिग्राम.

## आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धा :

माजी कुलपती मा. डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धेत कृष्णा अविनाश केंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले तर, पुणे विद्यापीठाच्या अक्षया चंद्रकांत शेळके यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

## वित्त व लेखा विभागामार्फत शिष्यवृत्ती वाटप :

विद्यापीठ आवारातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती/ फेलोशिप /स्टायपेंड इ. चे वितरण विद्यापीठाच्या मुख्य वित्त विभागामार्फत करण्यात येणार असून संबंधित विद्यार्थ्यांनी आपला महाराष्ट्र बँकेतील खाते क्रमांक वित्त विभागाकडे त्वरित द्यावा. अधिक माहितीसाठी सहाय्यक वित्त अधिकारी, श्री. नरेंद्र भोसले यांचेशी संपर्क साधावा. संपर्क दूरध्वनी क्र. : ०२० – २५६०१२३९.

> "Education is not the amount of Information that is put into your brain and runs rot there, undigested all your life"
> **Swami Vivekananda**

# University Campus

## Seminar on Pali :

Department of Pali conducted a National Seminar of Research Students of Pali and Buddist studies in March 2008. Dr. S.K. Pathak former HOD of Tibetan & Chinese studies, Sarnath was the Chief Guest,Hon, Vice Chancellor Dr. Narendra Jadhav Inaugurated the seminar.



## विद्यावाणी :

पुणे विद्यापीठाचे 'विद्यावाणी' हे स्वतंत्र एफ.एम. रेडिओ केंद्र आहे. या केंद्रावरुन सकाळी ९ ते ११.३०, दुपारी १.३० ते ४.०० आणि संध्याकाळी ६.३० ते ९ या वेळात कार्यक्रम प्रसारित होत असतात. शैक्षणिक कार्यक्रमांबरोबरच मनोरंजनात्मक कार्यक्रमही 'विद्यावाणी' वरुन प्रसारित केले जातात. महत्वाच्या कार्यक्रमांचे थेट प्रसारणही केले जाते. हे सर्व कार्यक्रम १०७.४ या लहरीवर विद्यापीठा पासून ८ कि. मी. अंतरापर्यत आपण ऐकू शकता.

## विद्यापीठ वसतिगृह :

पुणे विद्यापीठ आवारात वेगवेगळया अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या निकषांवर वसतिगृहात प्रवेश देण्यात येतो. मुलांच्या वसतिगृहात १०६६ मुलांची तर, मुलींच्या वसतिगृहात ६१९ मुलींची निवासाची व्यवस्था आहे. वसतिगृह प्रवेशाचे वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्येक सत्रासाठी रु. ४७५ ते ७०० एवढे शुल्क भरावे लागेल. या व्यतिरिक्त सुरक्षितता ठेव म्हणून रु. २५० भरावे लागतील. ठेवीची रक्कम विद्यार्थ्यास वसतिगृह सोडताना परत मिळू शकते.

एम. फिल. व पीएच. डी. साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह असून या विद्यार्थ्यांना रु. १,००० वसतिगृह शुल्क भरावे लागेल. याव्यतिरिक्त रु. २५० सुरक्षितता ठेव वेगळी भरावी लागेल.

शैक्षणिक वर्ष २००८–०९ पासून मुलींच्या नविन वसतिगृहात प्रवेश देण्यात येणार असून या वसतिगृहात ५०० मुलींची निवासाची सोय होणार आहे.

## पदव्युत्तर प्रवेश :

यासंबंधीचे नियम अध्यादेश क्र. १८१ अन्वये दि. १२.३.२००८ च्या परिपत्रक क्र. १२२ एफ. २००८ द्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

## एनर्जी स्टडिज् :

ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिअन्सी **(BEE)** या केंद्र सरकारच्या अखत्यारीतील संस्थेद्वारे घेतल्या जाणाऱ्या 'एनर्जी ऑडिटर' व 'एनर्जी मॅनेजर' या परीक्षांमध्ये पुणे विद्यापीठाच्या ऊर्जा अभ्यास प्रणाली विभागाच्या १२ विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय यश संपादन केले आहे. या विभागाद्वारे 'एनर टेक' ही राज्यस्तरीय कार्यशाळा दरवर्षी आयोजित केले जाते. ऊर्जा अभ्यास प्रणाली विभागात कार्यरत असलेल्या 'विभागीय चाचणी केंद्रात **(RTC)** सौर ऊर्जेवर चालणाऱ्या महाराष्ट्र, गोवा, आंध्र व कर्नाटक राज्यातील कंपन्यांच्या उत्पादनांना **ISI** दर्जा देण्याबाबत परीक्षण करण्यात येते. अधिक माहिती पुणे विद्यापीठाच्या या विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## पुणे विद्यापीठाचा गांडूळ खत निर्मिती प्रकल्प :

पुणे विद्यापीठ आवारातील कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी गांडूळ खत निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून या प्रकल्पाचे उद्घाटन १ मे, २००८ रोजी पुणे महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती राजलक्ष्मी भोसले यांचे शुभहस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव हे होते तर, प्रमुख अतिथी म्हणून महापालिका आयुक्त श्री. प्रविणसिंह परदेशी हे उपस्थित होते. विद्यापीठ आवारात दररोज सुमारे दोन टन ओला कचरा निर्माण होत असल्यामुळे तेवढयाच क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला असून येथे विद्यार्थ्यांनाही गांडूळ खत निर्मितीबाबतचे अद्ययावत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## सलग समपातळी चर श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास शिबिर :

दिनांक ३ मे ते ८ मे, २००८ दरम्यान पुणे विद्यापीठ आवारात विद्यापीठ स्तरीय शिबिर संपन्न झाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०० स्वयंसेवकांना विद्यापीठ आवारातील आनंदवन टेकडीवर सलग समपातळी चराचे प्रशिक्षण श्री. वसंत टाकळकर यांनी दिले. २५०० मिटर लांबीचे चर विद्यार्थ्यांनी तयार केले असून यामध्ये औषधी वनस्पतींची लावगड करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना, लॅण्ड स्केपिंगचे प्रशिक्षण डॉ. मोहन वामन यांनी दिले. डॉ. संभाजी पठारे व डॉ. संजय चाकणे यांनी शिबिराचे आयोजन केले. शिबिराचे उद्घाटन डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

## Advance Learning Center For Blind Students:

The Education & Extension Department of University of Pune established a 'Advance Technology Center' for blind students. The center is furnished with computer, high tech reading device for higher education and vocational training Vice Chancellor Dr. Narendra Jadhav inaugurated this center on Foundation Day of the University Dr.Vasant Pawar, Dr. Manik Jadhav, Dr. Pandit Vidyasagar, Dr. Sanjeev Sonawane were also present on the occasion.



## IMS Centenary Conference

The IMS centenary conference was organised at Mathematics department of University of Pune. Over 350 mathematicians from all over the world participated in this conference, Mr. Prithviraj Chavan, Minister from office of Prime Minister inaugurated the conference.
(Photo on Cover Page)

## आंतरराष्ट्रीय संस्कृत संम्मेलनात पुणे विद्यापीठास सुवर्ण पदक :

१६ ते १८ फेब्रुवारी २००८ दरम्यान संपन्न झालेल्या संस्कृत सम्मेलनात पुणे विद्यापीठाच्या खालील विद्यार्थ्याच्या शोधनिबंधास सुवर्ण पदक मिळाले.

बंदिता सत्पथी, माधवी गोडबोले, रुपाली कविश्वर, भव शर्मा, पूर्वचित्ती साठे, आणि रोहन कुलकर्णी.

### Soft Skill Development Program

UoP initiated this Programme through affiliated colleges with a view to develop the rural based economically poor and marginalized students. This program offers training in spoken English, ways and means to appear for an interview and total personality development basically good and effective communication skills.

# Curricular

### विद्यापीठीय विभागातील प्रवेश परीक्षेची सूचना :

बायोइन्फॉरमॅटिक्स, बायोटेक्नॉलॉजी, बॉटनी, केमिस्ट्री, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स्, एनव्हायरमेंटल सायन्स, जिऑग्राफी, जिओइन्फॉरमॅटिक्स्, जिऑलॉजी, हेल्थ सायन्सेस, हेल्थ सायन्सेस (डायटेटिक्स), मास्टर ऑफ पब्लीक सायन्स, इन्स्टुमेंटेशन सायन्स, मायक्रो बायोलॉजी, फिजिक्स्, स्टॅटिस्टिक्स्, व्हॉयरॉलॉजी (आय.बी.बी.), झुऑलॉजी, मॅथेमॅटिक्स्, **एम.ए.** जिऑग्राफी, मास कम्युनिकेशन अॅण्ड जर्नालिझम, परफॉर्मिंग आर्टस्, स्टॅटिस्टिक्स्, मॅथेमॅटिक्स्, **बी. ए.** परफॉर्मिंग आर्टस्, एम. कॉम., पोस्ट ग्रॅच्युएट डिप्लोमा इन एनव्हायरमेंटल अॅप्रिसिअल अॅण्ड मॅनेजमेंट (जिऑलॉजी), फॉरेन ट्रेड (इकॉनॉमिक्स्), जर्नालिझम (मराठी आणि इंग्लिश माध्यम) **बी. एस्सी.** पोस्ट ग्रॅच्युएट डिप्लोमा इन अॅफलाईड अॅनॅलिटिकल टेक्निक्स्, जि. आय.एस. अॅण्ड रिमोट सॅन्सिंग

**इतर :** एम. सीएम, एस (कम्युनिकेशन स्टडिज्), एम. टेक (अॅटमॉस्टफिअरिक सायन्सेस), एम.एस्सी, टेक (इंडस्ट्रियल मॅथेमॅटिक्स विथ कॉम्प्यूटर अप्लिकेशन्स्) एम. टेक. अॅडव्हान्स्ड डिप्लोमा इन मॉडेलिंग अॅण्ड सिम्युलेशन

तपशिलवार माहितीसाठी आणि ऑनलाईन अर्जासाठी **www.unipune.erent.in** वेब साईट पहावी.

### पदवीप्रदान समारंभ - निवेदन

पुणे विद्यापीठाचा १०२ वा पदवीप्रदान समारंभ डिसेंबर २००८/ जानेवारी २००९ मध्ये आयोजित करण्यात येत आहे. पदवी / पदविका प्रमाणपत्र अर्जाची विक्री व अर्ज स्विकारण्याची व्यवस्था पुणे विद्यापीठ कार्यालय, विविध महाविद्यालयात, नाशिक व अहमदनगर जिल्हा उपकेंद्रावर करण्यात आलेली आहे. सविस्तर माहिती विद्यापीठ संकेत स्थळ www.unipune.ernet.in वर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे संकेत स्थळावरुन पदवीप्रमाणपत्र अर्ज प्राप्त करुन घेण्याची सोय करण्यात आलेली आहे. विहित नमुन्यातील पूर्णपणे भरलेले अर्ज योग्य शुल्कासह कार्यालयीन कामाच्या दिवशी दिनांक २ जून, २००८ ते ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत विलंब शुल्कासह स्वीकारले जातील.

### विद्या वेतनात वाढ

पुणे विद्यापीठाच्या पदव्युतर विभागांमध्ये M.Phil. व Ph.D. साठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्या वेतनात वाढ करण्यात आली आहे शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून M.Phil. च्या विद्यार्थांस दर महा रु ३००० व Ph.D. करण्याऱ्या विद्यार्थ्यांस दरमहा रु ६००० विद्या वेतन देण्यात येणार आहे. अधिक माहिती साठी विद्याविठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाकडे संपर्क करावा.

## Geology Highlights

- **Change in the Admission Procedure :**
  From the year 2008-09 the Department will admit 20 students for M.Sc. Course on the basic of the performance of the applicants in the B.Sc. and entrance test examination of Pune University. Enterance test will be held in the month of June in the Department of Geology.
- **New courses to be launched :**
  The Department proposes to launchthe following one year diploma courses from June 2008.
  i) "P.G. Diploma in Geoenvironmental Appraisal and Management"
  ii) "P.G. Diploma in Advance Geotechnology"
- **Placement Cell :**
  Department has formed Placement Cell for the students for Campus Interviews.

## Computer Programming :

The students of University Campus Science Department (PUCSD) have shown their talents in the programming competition organised by Symbiosis Institute of Computer Science & Research. Many other leading Institutes also took part in it. After two rounds of competition following students of PUCSD declared Winners.

1. Gunjan Garg - Kanika Dhuria — 1st Prize
2. Gautam Kumar - Vivek Bharadwaj — 2 nd Prize

### अमोल दशपुत्रेच्या संशोधनाची राष्ट्रीय पातळीवर दखल :

'अविष्कार' या स्पर्धेअंतर्गत चुलीवर एकाचवेळी स्वैंपाक व गरमपाणी करण्याचे सोय असलेले उपकरण तयार केले. चेन्नई येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजना स्पर्धेमध्ये त्यास प्रथम पारितोषिक मिळाले. ककाणे या समर्थ अभियान गावामध्ये या विद्यार्थ्यांने अशा प्रकारच्या सोळा चुली तयार केल्या. शिक्षण आणि समाज यातील दरी कमी करण्याचा हा उत्कृष्ठ प्रयत्न म्हणून त्याचे सगळीकडे कौतुक होत आहे.

> "Injustice anywhere is a threat to justice everywhere."
> **Rev Martin Luther King, Jr.**

### अखिल भारतीय संशोधन स्पर्धा 'अन्वेषण' २००८



दि. १७ मे ते १९ मे या दरम्यान पुणे विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आली. या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावरील विविध शाखेतील नाविण्यपूर्ण एकूण ६० प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेमध्ये सहभागी होणारे स्पर्धक हे रांची, नागपूर, हैद्राबाद, पंजाब या चार ठिकाणी 'अन्वेषण'च्या विभागीय स्पर्धेतून निवडले होते.

अन्वेषण मुळे राष्ट्रीय पातळीवर महाविद्यालयीन तसेच विद्यापीठ विद्यार्थ्यामधील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन मिळेल यात शंका नाही. सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन आयसर या संस्थेचे संचालक मा.डॉ. के.एन.गणेश यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद मा. कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी भुषविले. या प्रसंगी अखिल भारतीय विश्वविद्यालय संघाचे महासचिव, डॉ. दयानंद डोणगावकर उपस्थित होते. डॉ. के.सी. मोहिते यांनी डॉ. पंडित विद्यासागर याच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन केले.

खालील विजेत्या स्पर्धकांना अखिल भारतीय विश्वविद्यालय संघाच्या वतीने पारितोषिक देउन गौरविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| अ गट : | तृतीय क्रमांक | — | राजेश कुमार, कोचिन विज्ञान तंत्रज्ञान विद्यापीठ, केरळ |
| ब गट | प्रथम क्रमांक | — | आशिष जाग्यसी, मुंबई विद्यापीठ, |
| क गट | प्रथम क्रमांक | — | साक्षी गुप्ता, जम्मु विद्यापीठ, |
| | द्वितीय क्रमांक | — | वरुण शर्मा, जम्मु विद्यापीठ, |
| | तृतीय क्रमांक | — | वंदना नायर, अविनाशिलिंगम महिला विद्यापीठ, |

पारितोषिके देताना प्रकल्पाची गुणवत्ता ही आंतरराष्ट्रीय दर्जाची आहे का? हे जाणीव पुर्वक पाहण्यात आले. या स्पर्धेचे वैशिष्टये म्हणजे विजेत्या स्पर्धकांना रु.५०,००० ते रु. १,००,००० पर्यंत रोख पारितोषिक, स्मृती चिन्हे अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ दिल्ली यांच्या वतीने तसेच सर्वोत्कृष्ठ संशोधन प्रकल्पास प्रा.एस.के.मुखर्जी मेडल विशेष पारितोषिक देउन सन्मानित करण्यात आले.या पारितोषिकाचा बहुमान आशिष जाग्यसी या विद्यार्थ्यास मिळाला.

Chetana चेतना Issue : 1 June 2008

### संख्याशास्त्र: विद्यापीठस्तरीय व्यक्तिमत्व विकास शिबीर :

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ, संख्याशास्त्र असोसिएशन आणि अहमदनगर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्ष संख्याशास्त्र वर्गातील विद्यार्थ्यांचे विद्यापीठस्तरीय व्यक्तिमत्व विकास शिबीर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे १७–१९ जानेवारी २००८ दरम्यान संपन्न झाले. या शिबीरात महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजाराम देशमुख, डॉ. सुधाकर कुंटे, डॉ. संभाजी पठारे, डॉ. उत्तरा नाईक निंबाळकर, डॉ. एस. बी. निमसे, डॉ. शिवकुमार करिअप्पा प्रा. व्ही.के. होळेहुनुर यांनी मार्गदर्शन केले.

### रसायनशास्त्र: संशोधन प्रकल्प व व्याख्यान स्पर्धा :

सर परशुराम भाऊ महाविद्यालय, पुणे आणि पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रसायनशास्त्रातील विद्यार्थ्यांची संशोधन प्रकल्पाची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांच्या व्याख्यान स्पर्धा व पोस्टर प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. पुणे, अहमदनगर, व नाशिक जिल्हयातील विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने या स्पर्धेत सहभाग नोंदविला. पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी स्पर्धेच्या परीक्षणाचे काम पाहिले.

### भौतिकशास्त्र: विद्यापीठस्तरीय कार्यशाळा :

पुणे विद्यापीठाचे भौतिकशास्त्र अभ्यास मंडळ आणि विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने मॉडर्न एनर्जी पार्क, कान्हेफाटा येथे 'उर्जा विषयक' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पदवी स्तरावर भौतिकशास्त्र हा मुख्य विषय निवडलेल्या २०० विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेऊन अपारंपारिक उर्जा स्त्रोतांची डॉ.चंद्रकांत पाठक यांचेकडून सप्रयोग माहिती घेतली व तशाप्रकारचे संशोधन प्रकल्प हाती घेण्याचा निर्धार केला. कार्यशाळेचे आयोजन आकुर्डी येथील रामकृष्ण मोरे महाविद्यालयाने केले होते. प्राचार्य आर.एम.मिसाळ, डॉ बेंद्रे, डॉ संभाजी पठारे, डॉ संजय चाकणे, इत्यादीनी विद्यार्थ्यांना उर्जा बचतीबाबत मार्गदर्शन केले.

### 'डोर' या चित्रपटाचे अवलोकन व चर्चा :

कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालय, देवळा येथे नागेश कुकनूर या प्रतिभावंत दिग्दर्शकाचा 'डोर' हा हिंदी चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. या चित्रपटाच्या अवलोकनानंतर लगेचच विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तररुप चर्चा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पध्दतीने चर्चेत सहभाग घेतला. चित्रपट पहावा कसा ? चित्रपटाचे वाचन म्हणजे काय ? प्रतिमांमधून अर्थनिर्मिती कशी साधली जाते ? अशा प्रश्नांतून विद्यार्थ्यांनी चित्रपट रसग्रहणाचा धडा घेतला.

### Eligibility Fee :

Students seeking admission to the first year of any Degree/ Diploma / Certificate (UG/PG) will have to pay Eligibility Fee as under :

| Sr. No. | Particulars | Non. Professional | Professional |
|---|---|---|---|
| 1 | Within State of Maharashtra | Rs. 100 | Rs. 200 |
| 2 | Out side the State of Maharashtra | Rs. 200 | Rs. 300 |
| 3 | Foreign students | Rs. 500 | Rs. 1000 |

| Last date for receiving eligibility forms in college/ Institute | |
|---|---|
| Without late fee | 31st August |
| With late fee of Rs.50/- | 29th September |
| With late fee of Rs.200/- | 31st October |

### यशवंतराव चव्हाण मेमोरिअल स्पर्धा :

यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय, पर्वती, पुणे येथे दिनांक १२.१.२००८ रोजी तिसरी राज्यस्तरीय 'यशवंतराव चव्हाण मेमोरिअल स्पर्धा' आयोजित केली गेली. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील, विविध जिल्हयातील २१ संघांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ डॉ. मृणाल रास्ते, कुलगुरु, सिम्बॉयोसिस आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालय यांच्या हस्ते व प्रमुख पाहुणे डॉ. गजानन एकबोटे यांच्या उपस्थितीत पार पडला. याच महाविद्यालयात चतुर्थ वर्ष बी.एस.एल. या वर्गात शिक्षण घेत असलेल्या कु. पौर्णिमा दारवटकर हिला शिवजागर प्रतिष्ठान, अंबेजोगाईतर्फे 'गुणवंत पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार तिला थोर सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



### आविष्कार :

महाविद्यालयीन व विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या शोधवृत्तीला चालना देण्यासाठी मा. राज्यपाल यांनी सन २००६ पासून राज्यस्तरीय 'आविष्कार' ही संशोधन प्रकल्प स्पर्धा सुरु केली आहे. शैक्षणिक वर्ष २००६–०७ मध्ये नागपूर येथे तर, २००७–०८ मध्ये मुंबई येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धांमध्ये पुणे विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद (General Championship) पटकावले आहे. पुणे विद्यापीठ संघातील २ विद्यार्थ्यांच्या संशोधनाचा भारतीय पेटंटसाठी अर्ज केला आहे.

### पुणे विद्यापीठाच्या सात विद्यार्थ्यांना पुरस्कार:

पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन अभ्यास विभागाच्या सात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर झालेल्या विविध लघुपट महोत्सवात अकरा पुरस्कार मिळाले आहेत.

अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा भाग म्हणून त्यांनी दहा ते बारा मिनिटांचे लघुपट बनविले होते. चेन्नई, पुणे, अलीगढ येथे झालेल्या लघुपट महोत्सवांमध्ये दिग्दर्शन, छायाचित्रण, संपादन या प्रकारांमध्ये या लघुपटांना पुरस्कार मिळाले आहेत. चेन्नई येथे झालेल्या गेटवे महोत्सवात सर्वोत्कृष्ट लघुपट प्रकारातील पहिले तीनही पुरस्कार संज्ञापन विभागाच्या विद्यार्थ्यांना मिळाले आहेत, अभिव्यक्ती पाटील दिग्दर्शित 'पंख' या लघुपटाला सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पहिला पुरस्कार मिळाला. तर याच विभागातील द्वितीय पुरस्कार अनिल माने दिग्दर्शित 'ओढ' या लघुपटाला मिळाला. तर सिंहगड इन्स्टिटयूट लघुपट महोत्सवात याला सर्वोत्कृष्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'मी रीटा आहे' या किम जो यंग दिग्दर्शित लघुपटासाठी सर्वोत्कृष्ट संकलनाचे पारितोषिक मिळाले. तसेच ऋत्विक सावंत, समीर कांबळे आणि स्वप्नील कापुरे यांनाही अनुक्रमे दिग्दर्शन, छायाचित्रण आणि सर्वोत्कृष्ट लघुपटासाठी पारितोषिके मिळाली.

### आनंदवन शिबिर :

मा. कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव याच्या प्रेरणेने गतवर्षी प्रमाणे याही वर्षी ३५० महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी व्यक्तिमत्व विकास व श्रमसंस्कार शिबिर आनंदवन येथे आयोजित केले होते.यावेळी काही विद्यार्थी –विद्यार्थीनीना बाबा आमटे यांच्या साठी रक्तदान करण्याची संधी प्राप्त झाली होती.या शिबिराचे आयोजन विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागांमार्फत करण्यात आले होते.

### महिला सबलीकरण :

समर्थ भारत अभियान अंतर्गत दिनांक ११ फेब्रुवारी, २००८ रोजी पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील दत्तक गावांमधील महिलांसाठी महिला सबलीकरणासाठी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५०० महिला सहभागी झाल्या होत्या. श्रीमती मीरा बोरवणकर, विद्या बाळ, सुनंदाताई पवार, दुर्गा तांबे, डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. अरुण अडसूळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुलगी झाली हो ! हे पथनाट्य दाखविण्यात आले.



### राष्ट्रीय सेवा योजना :

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेत ३५ हजार विद्यार्थी २३१ महाविद्यालयांतून स्वयंसेवक म्हणून काम करीत असून १७५०० स्वयंसेवकांनी विशेष शिबिरामधून सहभाग घेऊन १ कोटी ७५ लाख रुपयांची कामे केली आहेत. विशेषत: २३१ खेडी निर्मलग्राम करण्यासाठी व प्रत्यक्ष शौचालय निर्मितीची कामे पूर्ण झाली आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राज्यस्तरीय 'माहितीचा अधिकार' हे राळेगण येथे शिबिर संपन्न झाले. विद्यापीठ स्तरावरील तीन शिबिरे, हिरवा पिवळा जेजुरी गड, विज्ञान जागृती – लासलगाव, ग्लोबल वार्मिंग – देवळा येथे विभागीय स्तरावरील शिबिरे झाली. नियमित कार्यक्रमाद्वारे व्यक्तिमत्व विकास, पल्स पोलिओ, एड्स् जनजागृती, रक्तदान, पाणी प्रश्न, हिमोग्लोबीन तपासणी इ. उपक्रम राबविण्यात आले. विशेष शिबीरांसाठी ३५ लाख रूपये देण्याचा महत्वपूर्ण निर्णय विद्यापीठाने घेतला.



### क्रीडाविषयक घडामोडी :

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा मध्ये पुणे विद्यापीठास ७ सुवर्ण, ३ रौप्य आणि १६ कांस्य पदके मिळाली. यशोधन लोणकर, नेहा नाईक, रुपाली शिंदे, अनिरुध्द देशपांडे, कोमल कटके आणि प्रियंका देसाई हे सुवर्ण पदकाचे मानकरी ठरले. महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्य शिवछत्रपती पुरस्कार पुणे विद्यापीठाच्या खालील ७ खेळाडूंना मिळाला आहे. कु.कृतिका नाडीग (बुध्दिबळ); श्री. प्रसाद वामन गायकवाड (सायकलींग); कु. वृषाली विष्णू गायकवाड (सायकलींग); कु. निर्मला कृष्णा भोईर (कबड्डी); कु. सुमती रामन्ना पुजारी (कबड्डी); कु. अमृता पराशर (रोईंग); कु. योगिता शिवराम वाळुंज (जलतरंग), प्राग, चेक प्रजासत्ताक येथे जुलै २००८ मध्ये होणा–या स्पर्धासाठी पुणे विद्यापीठांच्या केतकी पाठक, जगदीश वर्द्रे व अनिरूध्द शर्मा यांची वर्ल्ड युनिव्हर्सिटी संघात निवड झाली आहे. यावर्षी पासून क्रीडा शिष्यवृत्ती देण्याचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी जाहिर केले. आंतरविद्यापीठीय अश्वमेघ – २००७ स्पर्धेत पुणे विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. आखिल भारतीय आंतरविद्यापीठ पोहण्याच्या स्पर्धेत २ सुवर्णपदके मिळविलेला बी.एम.सी.सी चा यशोधन लोणकर पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ठ खेळाडू ठरला.






### समर्थ भारत अभियान :

पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या प्ररणेने समर्थ भारत अभियान सुरु झाले असून आता त्याचे चळवळीत रुपांतर होत आहे. 'देशाच्या पातळीवर विकास खेडी मात्र भकास' हे दारुण वास्तव बदलण्यासाठी युवकांनी अंग झोकून या योजनेत काम सुरु केले आहे. महाविद्यालयांनी दत्तक घेतलेल्या ५०० गावांमध्ये मागील एक वर्षात या अभियानासाठी १८ सभा, १० कार्यशाळा व चर्चासत्रे, ५ प्रशिक्षणवर्ग, ४ शिबिरे व इतर १३ उपक्रमांचा समावेश आहे. आतापावेतो ८ लाख वृक्षारोपण, २३० गावांचे सर्वेक्षण, २०,००० कुटुंबाचे सर्वेक्षण, २० गावांचे जी. आय. एस. मॅपिंग ५२ गावांचे इतिहास लेखन, २१ गावांचे मातीपरीक्षण, ३ गावांतील जैवविविधता आदि उपक्रम पूर्वत्वास आले आहेत. २३१ गावांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेने निर्मलग्रामसाठी काम केले असून ४३८० शौचालये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष बांधली आहेत, गावांच्या पिण्याच्या पाणी, गांव तिथे क्रीडांगण, गांव तिथे ग्रंथालय इत्यादी उपक्रम समर्थ भारत अभियानांतर्गत राबविण्यात येत आहेत. आपणही या चळवळीत भाग घ्यावा.



# Announcements & Highlights

## No hike in Fees :

Vice Chancellor Dr. Narendra Jadhav declared in the meeting of Academic Council held on 8th & 9th May, 2008 that the recommendation of 5% increase in fee for the Academic year 2008-09 has been turned down as the University does not want to put an extra burden on the students. Semester System for PG

The University of Pune has decided to introduce a semester system at the Post Graduate (PG) level at all affiliated colleges from the academic year 2008-09. This is the significant step toward Academic reforms as suggested by University Grant Commission (UGC).

## मुलीच्या शिक्षणासाठी : क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती :

आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकांतून येणाऱ्या मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरीता पुणे विद्यापीठाने ही योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत निवड झालेल्या प्रत्येक मुलीला रु. ५००० एवढे अर्थसहाय्य विद्यापीठाकडून करण्यात येते. २००० मुलींना योजनेचा लाभ मिळेल. अधिक माहितीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यार्थी कल्याण अधिकारी यांचेकडे चौकशी करावी.

## गांडूळ खत प्रकल्प/नर्सरी युनिट साठी महाविद्यालयांना अनुदान :

प्रत्येक महाविद्यालयांने नर्सरी युनिट किंवा गांडूळ खत प्रकल्प 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थ्यांच्या मदतीने राबवावा. सदर प्रकल्प राबविण्यासाठी ज्या महाविद्यालकडून/मान्यता प्राप्त संस्थेकडून विद्यार्थी कल्याण मंडळास प्रस्ताव प्राप्त होईल त्यांना सदर प्रकल्प सुरु करण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान रु. १०,००० बिज भांडवल म्हणून देण्यात येईल. महाविद्यालयाचे/मान्यता प्राप्त संस्थेचे आवार स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रकल्पातून तयार होणारे गांडूळ खत/रोपे वापरात आणावीत.

## Age no Bar for Ph.D.

Senior citizens can register for Ph.D at UoP. The University of Pune has demonstrated its willingness to relax the Ph.D. registration norms for senior citizens. Prakashbhai Mohadikar(90) and Madanbai Lodha(81) are the first two students willing to register for Ph.D.

## "क्रीडा शिष्यवृत्ती" योजना :


वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या खेळाडुंना शैक्षणिक वर्ष २००७–०८ पासून "क्रीडा शिष्यवृत्ती" विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून देण्यात येईल. अधिक माहितीसाठी संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे यांचेशी संपर्क करावा. संपर्क दूरध्वनी क्र. ०२० – २५६०११४२ / ११४३



## Niveda Ramkumar To Represent India in South East Asian Summit.

She represented UoP at West Zone Youth Festival in Elocution and qualified for the National Youth Festival from amongst the teams from Rajasthan, Madhya Pradesh, Chhatisgarh, Goa, Gujrat and Maharashtra. Thirty Universities participated in West Zone Youth Festival held at Gwalior this year.

Two Universities each from East, West, North and South Zones participated in National Youth Festival where Niveda bagged a First Prizes (Gold Medal) and became qualified to represent the South East Asian submit to held soon. The Zonal and National Youth Festival were organised of Association of Indian Universities (AIU).



## 'SHIP FOR WORLD YOUTH 20' यात अजिंक्य देशपांडे याचा सहभाग

**Director General for Policies on Cohesive Society Cabinet Office, Government of Japan** यांच्या तर्फे आयोजित करण्यात आलेल्या **'SHIP FOR WORLD YOUTH 20' (SWY 20)** हा कार्यक्रम दिनांक १५ जानेवारी ते ५ मार्च २००८ या कालावधीत संपन्न झाला. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक अजिंक्य देशपांडे, इंग्रजी विभाग, पुणे विद्यापीठ हा सहभागी झाला होता. या कार्यक्रमात जपान व भारतासह १४ देशांचा सहभाग होता. भारतातर्फे एकूण ९ जण सहभागी झाले होते. यामध्ये अजिंक्य देशपांडेचे **Assistant National Leader** हे पद होते. या कार्यक्रमात १४ देशांमधील २४० उत्साही युवक – युवती सहभागी झाले होते.

या कार्यक्रमा अंतर्गत **Nippo Maru** या जहाजाने जपानसह सिंगापूर मस्कत(ओमान) व चेन्नई(भारत) या ठिकाणी भेटी दिल्या.या कार्यक्रमामध्ये **UN- Seminar's** मध्ये अजिंक्य देशपांडे याने पुणे विद्यापीठाच्या समर्थ भारत अभियान तसेच राष्ट्रीय सेवा योजना व **CCT** बद्दल माहिती दिली.

**'SHIP FOR WORLD YOUTH 20'** या कार्यक्रमाचे ब्रिदवाक्य **Friendship, Leadership, Partnership** हे होते. जगभरातल्या युवकांमध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस्य त्यांच्या संस्कृतीचे आदानप्रदान त्यांच्या दृष्टिकोनात विकास घडवून आणणे ही काही ठळक उद्दिष्टये या कार्यक्रमातून अपेक्षित होती.



**श्री. प्रकाश एकनाथ नवगिरे**
वाळुज, ता. जि. अहमदनगर.

माझे वडिल गवंडी काम करतात. आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक. 'कमवा व शिका' योजनेच्या माध्यमातून पुणे विद्यापीठात शिक्षण पूर्ण करण्याचे माझे स्वप्न होते. एम. ए. (इंग्रजी) वर्गात केवळ एक मार्क कमी असल्याने प्रवेश मिळू शकला नाही. पुन्हा नगरच्या महाविद्यालयात जाऊन एम. ए. पूर्ण केले. एम. फिल. साठी पुन्हा विद्यापीठात आलो, परंतु तीच निराशा पदरी आली, प्रवेश नाही मिळाला. निराश न होता संरक्षणशास्त्र विषयास प्रवेश घेऊन 'कमवा व शिका' योजनेत काम करुन वर्षभर कसून अभ्यास केला, एम. फिल. ला प्रवेश मिळाला व उल्लेखनिय बाब म्हणजे राष्ट्रीय पात्रता चाचणी **(NET)** जे आर एफ मध्येही उत्तीर्ण झालो. त्यामुळे आता माझी आर्थिक अडचण पूर्णपणे दूर झाली. ध्येय आणि चिकाटी यामुळेच मी यशस्वी होऊ शकलो.

# College Activities

## ग्रंथपाल हा माहिती साक्षरता व विद्यार्थ्यांमधील दुवा :

भारतीय जैन संघटना महाविद्यालय, वाघोली येथे आयोजित 'माहिती साक्षरतेत ग्रंथपालाची भूमिका' या एक दिवशीय चर्चासत्रामध्ये 'माहिती साक्षरतेमुळे विद्यार्थी सक्षम बनून संशोधनाकडे वळतात. ग्रंथपाल हा माहिती साक्षरता व विद्यार्थी यांच्यामधील दुवा आहे. या साक्षरतेचा शिक्षण पध्दतीत जास्तीत जास्त वापर करण्यासाठी ग्रंथपालाने प्रयत्न करावेत', असे मत आय. आय. टी. चे वरिष्ठ सहाय्यक ग्रंथपाल डॉ. डी. एन. फडके यांनी व्यक्त केले.

## व्यवसाय मार्गदर्शन :

रयत शिक्षण संस्थेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयामध्ये मा. राजेंद्र गोडबोले जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी, पुणे यांचे व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य ए.एम.वाघ हे होते.

## आंतरराष्ट्रीय परिषद :

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, विळद घाट, अहमदनगर येथे इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इजि. या विभागामार्फत 'इमरजींग टेक्नॉलॉजीज इन कॉम्प्युटींग, इलेक्ट्रॉनिक्स, इंबेडेड सिस्टीम आणि व्हीएलएसआय डीझाईन अ‍ॅण्ड एम्बेडेड सिस्टीम' या विषयावर दि. २० व २१ मार्च, २००८ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

## वीरमाता व वीरपत्नी यांना ग्रामदैवत माना - जेष्ठ पत्रकार मा. उत्तम कांबळे :

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नामपूर बागलाणच्या दिनांक १२ मार्च, २००८ रोजी जेष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्या उपस्थितीत व नामपूरच्या सरपंचांच्या अध्यक्षतेखाली हा वीरमातांचा सत्कार सोहळयाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात श्रीमती केसरबाई खैरणार (गिरणारे), श्रीमती कल्पना रौदळ (भाक्षीरोड), बेबीताई देवरे (निताणे), दुर्गाबाई निकम (उमराणे), कलाबाई अहिरे (गिलाणे), रुपाली बच्छाव (डाबली), सुमनबाई सोळूंके (खायदे), उषा सोनजे (सटाणा), प्रतिभा पाटील (मालेगाव), नौशाबा मेंहदी हसन (मालेगाव), महिला मंडळाच्या अध्यक्षा इंदिराबाई सावंत (नामपूर), डॉ. सुनिता पाटील, सौ. गिरासे, ताईबाई जाधव, तानुबाई घरटे (नामपूर), सखुबाई पगार, रख्माबाई मोरे, कमलाबाई गोटार इ. वीरमाता व वीरपत्नी तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.



## संगमनेर महाविद्यालयात हिमोग्लोबीन तपासणी व जाणिव जागृती शिबिर :

स्त्रीयांना खरोखरच सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी व त्यांच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष पुरविण्याची गरज लक्षात घेऊन संगमनेर महाविद्यालयातातील प्राणीशास्त्र विभाग व विद्यार्थिनी मार्गदर्शन कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थिनींच्या रक्तातील हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे आयोजन दि. ३ जानेवारी, २००८ रोजी करण्यात आले होते. महाविद्यालयातील २४४ विद्यार्थिनींनी या शिबिराचा लाभ घेतला. तपासणीअंती असे लक्षात आले की, ७१.८० टक्के मुलींमध्ये एचबीचे प्रमाण आवश्यक प्रमाणापेक्षा कमी आहे. एकंदर एचबी बाबत चिंता करण्यासारखी परिस्थिती जाणवली एचबीचे असेच न्यून प्रमाण राहिल्यास भविष्यात त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. म्हणून युवतींमध्ये एचबी बाबत मोठयाप्रमाणात जाणीव जागृती होण्यासाठी शिबिराचे आयोजन दि. ५ फेब्रुवारी, २००८ रोजी करण्यात आले.

तसेच योग व निसर्गोपचार विभाग आणि पेशंट केअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने १५ दिवसांचे शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ६५ महिला पुरुषांनी यशस्वी सहभाग नोंदविला. या शिबिरात ऐरोबिक्स, सुर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम इ. अभ्यास शिबिरार्थींकडून करुन घेण्यात आला. त्याचा परिणाम १५ दिवसात अर्धाकिलोपासून ४ किलोपर्यंत वजन कमी झाल्याचे मनोगत शिबिरार्थींनी व्यक्त केले.

## काजू प्रक्रिया व सिमेंट ब्लॉक निर्मिती :

अ‍ॅड.एम.एन.देशमुख महाविद्यालयाने १ लाख ५० हजार रुपये भांडवल गुंतवणूककरुन काजू प्रकल्प सुरु केला. या प्रकल्पामध्ये रोज १० ते १५ कमवा व शिकाचे विद्यार्थी काम करतात. त्यामध्ये काजू बॉईल करणे, कटिंग करणे, ड्राय करणे, पिनींग व पॅकींग करणे इ. गोष्टींचा समावेश आहे.

तसेच याच महाविद्यालयात सिमेंट ब्लॉक निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन मा.डॉ.नरेंद्र जाधव, कुलगुरु पुणे विद्यापीठ, मा.डॉ.संभाजी पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ व पुणे विद्यापीठातील सर्व सिनेट सदस्य यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या योजनेत सिमेंट, वाळू, काच यापासून १२''x ६''x ९'' इंच सिमेंट ब्लॉक बनवला जातो. या प्रकल्पात आळीपाळीने जवळ जवळ २५ मुलांना काम उपलब्ध करुन दिले जाते. रोज कमीत कमी १०० ब्लॉक बनविले जातात. एका ब्लॉकची अंदाजे किंमत १० रुपये असून रोज जवळ जवळ १००० रुपयांचे उत्पादन केले जाते.

## सिंहगड किल्ल्यावर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन :

'दुर्ग' हे राज्याची संपत्ती असून त्याच्या आश्रयाने सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता येते. याची जान छत्रपती शिवरायांना होती म्हणून त्यांनी दुर्लक्षीत झालेल्या किल्ल्यांना डागडूजी करुन, नवे किल्ले बांधून त्याचा उपयोग स्वराज्य निमितीसाठी केला म्हणूनच त्यांना दुर्गराज म्हणतात. महाराजांनी दुर्ग बांधणीत अनेक प्रयोग केले त्यातून दुर्गस्थापत्यशास्त्राचा विकास झाला. पिंपरी येथील रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय व पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत सिंहगड किल्ल्यावर आयोजित केलेल्या विद्यार्थ्यांच्या चर्चासत्रात श्री. निनाद बेडेकर बोलत होते. त्यांनी या चर्चासत्रात शिवरायांनी दुर्गनिती या विषयावर मार्गदर्शन केले.



## रयत मिलिटरी अकॅडमी :

महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींना स्थलसेना, वायुसेना, सीमा सुरक्षा दल, राज्य राखीव पोलिस दल अशा सुरक्षा दलात करिअर करण्यासाठी मार्गदर्शन मिळावे, या हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात रयत कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या वतीने रयत मिलिटरी अकॅडमीची स्थापना करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या प्रेरणेतून आणि प्रबोधिनीचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १५ जुलै, २००७ रोजी ध्वजारोहन करुन या अकॅडमीची स्थापना करण्यात आली. विशेष म्हणजे ज्या विद्यार्थ्यांना एन.सी.सी. मध्ये प्रवेश मिळाला नाही त्यांनाच प्रवेशात प्राधान्य देण्यात आले. १५ जुलै, २००७ ते १५ जानेवारी, २००८ या सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत प्रवेश घेतलेल्या ४० छात्रसैनिकांची बौध्दिक आणि शारीरिक अशा दोन पातळीवर चाचणी घेण्यात आली. शारीरिक चाचणीत उंच उडी, गोळाफेक, धावणे, पुलअप्स अडथळयाची शर्यत इत्यादींचे प्रशिक्षण देण्यात आले. दिनांक १४ जानेवारी, २००८ रोजी या अकॅडमीची पासिंग आऊट परेड पार पडली. या अकादमीची ४ विद्यार्थी विविध दलात निवडले गेले आहेत.

The Catalyst Consultants Pvt. Ltd., Pune (TCCPL) या कंपनीने प्रि.एन.जी. नारळकर इन्स्टिटयूटमधील M.P.M.-I व D.B.M.-I या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी 'Corporate Career Building Programme' दि. २१ ऑगस्ट व १७ सप्टेंबर, २००७ या काळात आयोजित केला होता.

**मूट कोर्ट** डी. इ. एस. विधी महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवरील खालील 'मूट कोर्ट'

स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

- 7th Surana and Surana International Technology Moot Court Competition, 2008
- South Western Regional Human Rights National Moot Court Competition 2008, V.M.Salgaocar College of Law, Goa
- D.T.Jaibhave Trial Advocacy Moot and Judgment Writing Competition, 2007 या स्पर्धेमध्ये कु. ऋषिका राजाध्यक्ष हिला Best Lady Advocate म्हणून घोषित केले व प्रमोद जाधव याने **Best Judgement** Write-Up चा मान पटकावला.
- Youth Summit Paper Presentation, Symbiosis College,
  या स्पर्धेमध्ये प्रमोद जाधव यांने Pune Judge Appreciation Award पटकावले.

## Pune University Students Win at I.I.T Powai's Techfest '08 :

Students from the G.S.Moze College of Engineering emerged victorious in the international event 'Full Throttle-Grand Prix 2008' held at I.I.T Powai. The event required the teams to build a radio controlled formula one car capable of racing around a concrete track. The maximum allowed engine capacity was 3.2 cc. Engine and radio control unit have to be purchased from OEM. Differential may or may not be an OEM purchase. As per rule the complete chassis design, suspension type and mounting, vehicle layout, steering mechanism has to be strictly manufactured by students. The event saw participation from 110 teams, including teams from Dubai.

## सरपोतदार करंडक प्रसंग नाटय स्पर्धा

बी. एम्. सी. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक मंडळाच्यावतीने आंतरमहाविद्यालयीन 'सरपोतदार करंडक प्रसंग नाटय स्पर्धा' आयोजित केली जाते. या वर्षी ही स्पर्धा दि. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी आयोजित करण्यात आली. जागतिक स्तरावरील अर्थ व व्यापार विषयक घडामोडींची अभ्यासपूर्ण माहिती व्हावी यादृष्टिने **Model WTO** हा विश्व व्यापार संघटनेच्या कार्यपध्दतीवर आधारित दोन दिवसीय अभिरुप विश्व व्यापार संघटनेचा कार्यक्रम दि. १ व २ फेब्रुवारी, २००८ रोजी आयोजित करण्यात आला होता. कॉमर्स लॅबोरेटरीच्यावतीने दरवर्षी **Business Talent Hunt (BTH)** ही आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजित केली जाते. या वर्षी ही स्पर्धा दि. १२ व १३ ऑक्टोबर, २००७ रोजी घेण्यात आली. या स्पर्धेत पुणे शहरातील १६ महाविद्यालयांनी भाग घेतला.

**मंत्रालयाची सहल :** शाळा महाविद्यालयामध्ये शिकत असताना विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींविषयी आकर्षण असते. मात्र त्या गोष्टींपर्यंत पोहचणे सर्वांनाच शक्य होत नाही. यासाठी मु. सा. काकडे महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषय विभागाचे प्रा. अजय दरेकर यांनी मंत्रालयात जाण्याची कल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडली. सोमनाथ केंजळे व विद्यार्थ्यांनी या कल्पनेला दुजोरा दिला. यामुळे ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांनी राज्याचे भवितव्य जेथून ठरविले जाते ते मंत्रालय पाहिले, शिवाय राज्याचे अर्थशास्त्रही समजून घेतले. दोन दिवसांच्या या सहलीत विद्यार्थ्यांनी प्रथम रिझर्व्ह बॅंकेचे मुंबईतील नाणेसंग्रहालय पाहिले. या संग्रहातील इ.स.पूर्व ६०० पासून आजअखेर वापरात आलेली नाणी, चलनी नोटा, हुंडया प्रत्यक्ष पाहायला मिळाल्या. संग्रहालयाचे प्रमुख अधिकारी श्री. गोखले यांनी नाण्यांचा इतिहासही मुलामुलींना समजून सांगितला. आरबीआयचे उपमहाप्रबंधक जी. रघुराज यांच्याशी विद्यार्थ्यांनी दोन तास संवाद साधला. त्यांच्याकडून बॅंकेची कार्यप्रणाली समजावून घेतली. नोटा छपाई कारखान्यापासून विविध योजनांपर्यंतची माहिती रघुराज यांनी दिली. आरबीआयच्या क्लिअरिंग हाऊसलाही परवानगी काढून विद्यार्थ्यांनी भेट दिली. येथील अधिकारी प्रियरंजन दास यांनी या उत्सुक चेहऱ्यांना नाराज केले नाही. एका मिनिटात देशातल्या वेगवेगळया बॅंकांचे १८०० चेक वटवण्याची विशिष्ट पध्दती प्रात्याक्षिकासह मुलांनी पाहिली आणि सारे आवक झाले. मंत्रालयाने मुलामुलींना विशेष भुरळ घातली. तर अर्थमंत्री जयंत पाटील यांच्याशी साधलेला दिलखुलास संवाद सहलीतील सर्वात आनंददायी प्रसंग होता, असे योगिता काकडे, तृप्ती निगडे, रोहन क्षीरसागर, संकेत केंजळे या विद्यार्थ्यांनी सांगितले. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प कसा तयार होतो, कसा सादर करतात, राज्याची आर्थिक स्थिती, शेती व्यवस्था यांची सविस्तर माहिती दिली. ग्रामीण भागाच्या विकासासाठी काय केले पाहिजे असा प्रतिप्रश्न करुन त्यांनी युवा पिढीची मते जाणून घेतली. सुमारे पावणेदोन तास प्रश्नोत्तरे रंगत राहिली.

## चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय आयोजित पदभ्रमण :

महाविद्यालयाच्या ५० विद्यार्थीनिंनी घोडनदीची ५२ कि.मी.ची पायी परिक्रमा पूर्ण करुन नदीकाठावरील जैवविविधतेचा व वसलेल्या गावांचा शास्त्रोक्त अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासात भौगोलिक सर्वेक्षण,जी.आय.एस. मॅपिंग,ऐतिहासीक नोंदी,नदीपात्राची वैशिष्टे,सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण, पाणी परिक्षण इत्यादी बाबींचा समावेश होता. कुकडी नदीतील निघोज येथील रांजणखळगे जगप्रसिध्द आहेत. अशाच प्रकारची रांजणखळगी घोडनदीच्या पात्रात कोहोकडी गावाजवळ निर्माण होत असल्याचे वरील अभ्यासातून विद्यार्थ्यांना आढळल्याचे प्राचार्य नंदकुमार निकम यांनी सांगितले. या शिबीरात कला,विज्ञान,वाणिज्य,बी.बी.ए.,बी.सी.ए.,व एम.सी.सी. च्या विद्यार्थीनिंनी सहभाग घेतला. या शिबीरासाठी विद्यार्थी कल्याण मंडळाने अर्थसहाय्य केले.

## सौरऊर्जा निर्मिती :

रोजगार आणि विजनिर्मिती या दोन्ही 'पेटलेल्या' प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेऊन केटीएचएम महाविद्यालयाचा भौतिकशास्त्र विभाग आणि एस. पी. लोकऊर्जा निर्मिती अ‍ॅण्ड रिसर्च विभाग यांनी संयुक्त विद्यमाने ऊर्जानिर्मितीसह रोजगारही उपलब्ध होईल, असे सौरऊर्जेवर आधारित अभिनव 'युनिट्स' तयार केले आहेत.

'लोकऊर्जा निर्मिती' ने विशेषत: ग्रामीण व दुर्गम भागाला लक्ष करत अल्पदरात सौरऊर्जा निर्माण होईल, त्यातून थोडाफार रोजगाराचाही प्रश्न सुटेल, या हेतूने चार वेगवेगळे युनिट्स तयार केले आहेत. त्यात 'रिन्यूएबल एनर्जी ड्रिंकींग सिस्टम', 'अ‍ॅग्री अ‍ॅण्ड फुड प्रोसेसर ड्रायर', 'ह्युमन होम जनरेटर सिस्टम', आणि 'कॉईन फोन अ‍ॅण्ड होम लाईट' या उपकरणांचा समावेश आहे. प्रा. के. के. ठाकूर, प्रा. डी. व्ही. अहिरे आणि विभागप्रमुख डॉ. ए. एस. मंडलिक यांच्या टीमने सहकाऱ्यांसह ही नवनिर्मिती केली आहे.

'या प्रोजेक्टसाठी प्रामुख्याने ग्रामीण आणि दुर्गम भागाचा विचार करण्यात आला. विजनिर्मिती म्हणजे पैसा वाचले, त्याशिवाय कॉईन बॉक्सच्या माध्यमातून टेलिफोनसेवेपासून वंचित राहीलेली गावं जोडली जातील आणि ज्यांच्या घरापर्यंत आजही वीज पोहोचलेली नाही. त्यांची घरं ऊजळून निघतील. आमच्या या निर्मितीचं फलित म्हणजे या युनिट्सच्या माध्यमातून शहरासह ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होईल'', असा विश्वास केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी व्यक्त केला.

या नवनिर्मितीची दखल राज्य शासनाच्या अपारंपारिक ऊर्जास्त्रोत विभागाने घेतली असून ' रिन्युएबल एनर्जी ड्रिंकींग सिस्टम' ला मान्यता दिली आहे. हे युनिट्स बाजारात अल्पदरात उपलब्ध व्हावेत, यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

# Upcomings

## Triple Connectivity :

To strengthen the governance of the University, efforts have been made to provide online support for admissions for PG courses in the University Departments. This initiative will be further strengthened during current academic year 2008-09 where efforts are being made to establish Triple Connectivity with 472 colleges & 243 recognised institutes in a phased manner.

## अभ्यासक्रमातील बदल :

विद्यापीठ अधिकार मंडळाने सर्व विद्याशाखांचे अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय घेतला. विद्यापरिषदेच्या ८ आणि ९ मे, २००८ रोजी झालेल्या सभेत पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे सर्व विषयांचे अभ्यासक्रम बदलून नवीन अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे. येत्या जून २००८ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या वर्गाच्या व विषयांच्या अभ्यासक्रमात करण्यात आलेल्या बदलांची नोंद घ्यावी.

**Dates of Commencement and conclusion of Terms for the Academic Year 2008-09:**


| Faculty/ies | First Term | Second Term |
|---|---|---|
| Arts, Commerce, Science | 16/06/2008 - 31/10/2008 | 25/11/2008 - 30/04/2009 |
| Law, Ayurved,/Homeopath, Pharmacy | 20/06/2008 - 31/10/2008 | 21/11/2008 - 30/04/2009 |
| Education /Physical Education | 18/06/2008 - 20/10/2008 | 14/11/2008 - 30/04/2009 |
| Engineering Courses | 01/07/2008 - 18/10/2008 | 01/01/2009 - 18/04/2009 |
| Architecture Courses | 16/06/2008 - 11/10/2008 | 15/12/2008 - 04/04/2009 |
| Management | 11/07/2008 - 13/12/2008 | 01/01/2009 - 20/05/2009 |
| PG courses/ University Depts. | 01/07/2008 - 18/12/2008 | 01/01/2009 - 20/05/2009 |

(Please refer UoP Circule No. 187 & 188 of 2008 for further details.)



### डॉ. माणिक जाधव

डॉ. माणिक जाधव पुणे विद्यापीठाचे कुलसचिव या पदावर दिनांक ०४ जानेवारी, २००८ पासून रुजू झाले आहेत. यापूर्वी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे कार्यरत होते.



### श्री. संजय गवई

श्री. संजय गवई पुणे विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी या पदावर दिनांक ०१ फेब्रुवारी, २००८ पासून रुजू झाले आहेत. यापूर्वी ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कार्यरत होते.

# Visitors

Mr. Prithviraj Chavan, Minister from office of Prime Minister

Mr. Gynendra Pande, Emory University USA

Dr. Edison Samraj, Ambassador of Peace

Mr. Satish Kulkarni, Counselor for Science, Technology, Environment & Health Affairs U.S. Embassy, New Delhi.

Laura Jenkins, Associate Professor & Fulbright New Century Scholar, University of Cincinnati, USA,

H.E. Mr. Ly Bounkham, Ambassodar of Lao P.D.R.

Dr. Phone Bouaravong, First Secretary Embassy of Lao P.D.R., New Delhi.

Prof. Anjini Kochar, Professor of Economics at Stanford University

H.E. Mr. Ly. Bounkham, ESOL Ambassador of Lao P.D.R.

Mr. Carl Pope, Executive Director, Sierra Club, Washington DC 20002

Stephen Mills, Director, International Programmes Sierra Club, Washington DC 20002

Prof. Michael Lofus, Head of Faculty of Science Cork Institute of Technolocy, Bishopstown, Cork, Ireland

Mrs. Mary Hanafin, Minister for Education & Science, Ireland

Prof. Pascal Formisyn, GEM France

Prof. Jacques Schwartzentruber, Head of International Relations

Prof. Michel Pavageau, Colleague from Ecole des Mines de Nantes

Ms. Lynne Gedkowski, Deputy Director, American Centre, Mumbai.

Prof. Tarrant, Secretary General, Association of Commonwealth Universities. Woburn House, 20-24 Tavistock Square, London, WCIH 9HF, United Kingdom.

Ms. Ianchambers, Regional Manager, South Asia, University of Cambridge, International Examinations, Cambridge House, Delhi

Ms. Val Sismey, Qualifications Development Manager, University of Cambridge, United Kingdom

**Chetna** is the Students' Bulletin of Board of Student's Welfare.
We welcome your responses at the following address

**Board of Students' Welfare**
D.V. Potdar Sankul, University of Pune, Ganeshkhind, Pune 411 007
Tel. : 020 2560 1154 / 2560 1153, Fax : 020 2569 7341
Email : bsw@unipune.ernet.in

**Important websites of UoP**

http://www.unipune.erent.in
http://www.Vidyavani.unipune.erent.in
http://www.unipune.erent.in/dept/bsw
http://www.unipune.erent.in/bcud
http://www.unipunenss.in